आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१४ मार्च २०२४ - गुरुवार

एक राष्ट्र एक निवडणूक संदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीनं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना अहवाल सादर केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. समितीनं सादर केलेला अहवाल १८ हजार ६२६ पानांचा आहे. या अहवालात सर्व संबंधित पक्ष आणि तज्ज्ञांशी झालेल्या विस्तृत चर्चा आणि १९१ दिवसांच्या संशोधनाच्या निष्कर्षांचा समावेश असल्याची माहिती कायदा आणि न्याय मंत्रालयानं दिली आहे.

<><><><>

सी ए ए म्हणजे नागरीकत्व सुधारणा कायदा हा नागरिकत्वाचे अधिकार देणारा असून कोणाचेही अधिकार काढून घेण्यासाठी केलेला नाही असं गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. एका वृत्त संस्थेला मुलाखत देताना त्यांनी सांगितलं की या कायद्यामुळे अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानातून आलेल्या स्थलांतरित हिंदू, बौद्ध, जैन, शीख, ख्रिस्ती आणि पारसी शरणार्थींना भारताचं नागरिकत्व मिळेल. एनआरसी म्हणजे नागरिकांची राष्ट्रीय नोंदणी आणि सीएएचा काहीही संबंध नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

नागपूरमध्ये देशाची लॉजिस्टिक राजधानी होण्याची क्षमता असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. वर्धा जिल्ह्यात सिंदी रेल्वे इथलं ड्रायपोर्ट आणि मल्टी मोडल लॉजिस्टिक पार्क इथल्या रेल्वे टर्मिनल सेवेचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते आज झालं. त्यावेळी ते बोलत होते. सिंदी रेल्वे इथल्या ड्राय पोर्ट वरून विदर्भातला कापूस, कापड, संत्री यासारख्या

उत्पादनाची निर्यात करता येईल. विदर्भातल्या शेतकऱ्याला याचा फायदा होईल, असं ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी काँग्रेस सरकारचे  दरवाजे सदैव खुले असतील  असं काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान ते आज नाशिक जिल्ह्यात चांदवड इथं एका जाहीर सभेत बोलत होते. इंडिया आघाडीचं सरकार आल्यावर शेतकऱ्यांना जीएसटीमधून वगळणार असल्याचं , तसंच पीक वीमा योजनेची पुनर्रचना करणार असल्याचं आश्वासन त्यांनी दिलं.  हमी भावाचा कायदा करावा या मागणीसाठी शेतकरी दिल्लीच्या सीमेवर आणि रामलीला मैदानावर आंदोलन करत आहेत. मात्र  मोदी सरकार त्यांची दखल घेत नाही. अशी टीका त्यांनी केली.

यावेळी व्यासपिठावर शरद पवार आणि संजय राऊत यांच्या सह काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते.

<><><><><>

महामार्गांवर टोल भरण्याकरता पेटीएम फास्टटॅग वापरणाऱ्यांनी दुसऱ्या बँकेचा फास्टटॅग वापरावा, अशी सूचना भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं दिली आहे. भारतीय रिझर्व बँकेनं पेटीएमवर निर्बंध घातले असल्याने पेटीएमच्या फास्टॅगमधे  उद्यापासून रक्कम भरता येणार नाही. त्यामुळे इतर फास्टॅगची व्यवस्था न केल्यास टोलची दुप्पट रक्कम भरावी लागेल किंवा दंड भरावा लागेल. मात्र पेटीएमच्या फास्टॅगमधे शिल्लक रक्कम संपेपर्यंत तो  वापरता येईल असं प्राधिकरणाने स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

नवमतदारांसाठी मेरा पहला वोट देश के लिए हे मतदार जागरूकता अभियान सुरू आहे. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असतो. यावेळी पहिल्यांदा मतदान करणार असलेल्या नवमतदारांनी या लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी होऊन आपला मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन अभिनेता सुबोध भावे यांनी केलं आहे.

**होल्ड बाईट...सुबोध भावे**

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई संघानं ४२ वा विजय नोंदवला असून अंतिम सामन्यात मुंबई च्या संघानं विदर्भ संघाचा १६९ धावांनी पराभव केला. विजयासाठीचे ५३८ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेला विदर्भाचा संघ ३६८ धावात गारद झाला.

या सामन्यात विदर्भ संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्विकारलं. मुंबईनं आपल्या पहिल्या डावात २२४ धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देतांना विदर्भाचा पहिला डाव केवळ १०५ धावांमध्ये संपुष्टात आला होता. मुंबईनं आपल्या दुसऱ्या डावात ४१८ धावा करत विदर्भ संघापुढं विजयासाठी ५३८ धावाचं आव्हानं दिलं.

**//<><><><><> //**